**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १००/२०१९ मधील निशाणी क्र. २८ वरील आदेश</u>**

( कमळाबाई पथवे व इतर वि. ठकुबाई लोते व इतर)

वादी यांनी सदरचा अर्ज वादी क्रमांक २ यांचे विरुध्द दावा अवसायन पावल्याचा आदेश रदद् होणेकरीता अर्ज दाखल करणेस झालेला उशिर माफ होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

**०२.** अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**०३.** वादी क्रमांक २ यांचा मुत्यु दिनांक २०.०९.२०२३ रोजी झाला आहे. कायदेशीर तरतुदींप्रमाणे सदर वादी क्र. २ चे कायदेशिर प्रतिनिधी दिनांक १९.१२.२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी अभिलेखावर घेणे आवश्यक होते. परंतु, तसे न केल्यामुळे वादी क्र. २ करीताचा दावा अवसायन पावला आहे. कायदेशिर तरतदुींप्रमाणे दावा अवसायन पावल्याचा आदेश रदृद होणेकरीता प्रस्तुत अर्ज दि. १९.०२.२०२४ रोजी किंवा त्यापुर्वी दाखल करणे आवश्यक होते. पंरतु वादींनी प्रस्तुत अर्ज दिनांक १६.०१.२०२५ रोजी दाखल केला आहे. दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता मुदत अधिनियम १९६३ चे कलम ५ प्रमाणे वादींना प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास १० महिने २६ दिवसांचा विलंब झाला आहे.

**०४.** वादी यांनी अर्जामध्ये असे कथन केले आहे की, वादी यांना कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे त्यांना मुदतीमध्ये वादी क्र. २ चे कायदेशिर प्रतिनिधी अभिलेखावर घेता आले नाही. वादीने नमूद केलेले प्रस्तुत कारण योग्य व प्रामाणिक असल्याचे दिसून येते. तसेच प्रतिवादींनी प्रस्तुत अर्ज नामंजूर करावा अशी मागणी केलीली नाही.

**०५.** वादींनी उशिराबाबत नमूद केलेले कारण योग्य व संयुक्तिक वाटते. वादीने दावा वाटपाकरीता दाखल केला असल्यामूळे वादी क्र. २ च्या मृत्युपश्चात

त्यांच्या कायदेशिर प्रतिनिधींना दावा चालविण्याचे अधिकार प्राप्त होतात. त्यामूळे त्यांना अभिलेखावर सामील न केल्यास सदर दाव्याचा निर्णय होणेकरीता अडचण निर्माण होईल. सबब, वादी क्र. २ चा दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होणेकरीता अर्ज दाखल करणेस झालेला विलंब माफ करणे मला न्यायोचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**आदेश**

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्र. २ चा दावा अवसायन पावल्याचा आदेश रद्द होणेकरीता अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब वादींनी प्रतिवादींना दंड रक्कम रु.२००/— दिल्यानंतर माफ करण्यात येतो.

सही/—

स्थळः— इगतपुरी
( मो. द. ननवरे )
दिनांकः— २०/०१/२०२६
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
इगतपुरी.